सकाळ

# 'नवमहाराष्ट्र'मध्ये पोलिसांशी थेट भेट

**पिंपरी, ता. २० :** पंख सामाजिक संस्था आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या वतीने शाळांगण प्रकल्पाअंतर्गत पिंपरी वाघिरे येथील नवमहाराष्ट्र विद्यालय आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पोलिसांशी थेट भेट कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी 'छेडछाड, प्रेम-मैत्री, आकर्षण व कायदा' विषयावर पॉस्को कायद्याविषयी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाची संकल्पना पंखच्या अध्यक्षा स्मिता आपटे यांची होती. या वेळी दामिनी पथकाच्या पोलिस मार्शल सुप्रिया पारसे, पिंपरी पोलिस मार्शल दीपक खुणवे उपस्थित होते. पंख संस्थेच्या समुपदेशकांनी चर्चेतून [...] प्रेम, निखळ मैत्री, करिअर, लग्न आणि सेटलमेंट अशा महत्त्वाच्या [...] संकल्पना समजाविल्या. पारसे य[...] प्रेम संबंध, शारीरिक संबंध, छेड[...] करणे अशा प्रकरणात होणाऱ्या शिक्षेबद्दल माहिती दिली.

Pune, PCMC-Today
21/08/2018 Page No. 3